# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO: ९००१:२०१५) (ISO/IES: २७००१:२०१३)
शासकीय तंत्रनिकेतन इमारत, चौथा मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दूरध्वनी क्र.: ०२२-६२५४२१००/१०३/१६४
ई-मेल:- secretary@msbte.com वेब: www.msbte.ac.in

जा.क्र.मरातंशिमं/का-५४/प्र.सं.अ./२०२४-२५/6911 दिनांक: 28 OCT 2024

**महत्त्वाचे / कालमर्यादीत परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य,
अभियांत्रिकी, औषध निर्माणशास्त्र, वास्तुकला आणि अल्प मुदतीचे अभ्यासक्रम
राबविणा-या सर्व पदविका संस्था व स्वायत्त पदविका संस्था.

**विषय — संस्था मॉनिटरींग सॉफ्टवेअर मध्ये ऑनलाईन माहिती भरणेबाबत.**

उपरोक्त विषयानुसार AICTE मान्यता प्राप्त अभियांत्रिकी (स्वायत्त संस्थासह) पदविका संस्था, औषध निर्माणशास्त्र (फार्मसी) पदविका संस्था, वास्तुकला परिषद (Council of Architecture) पदविका संस्था तसेच अल्प मुदतीचे अभ्यासक्रम राबविणा-या संस्था (Non-AICTE) संस्था (स्थापना वर्षापासून ०५ वर्षाच्या आतील नव्याने सुरु झालेल्या संस्था) यांचे प्रथम संस्था अवेक्षण **शैक्षणिक वर्ष २०२४-२५** मध्ये **दि. १८/११/२०२४ ते २५/११/२०२४** या कालावधीत करण्यात येणार आहे.

तरी मंडळाशी संलग्नित **सर्व अभियांत्रिकी, फार्मसी, वास्तुकला आणि अल्प मुदतीचे अभ्यासक्रम व तसेच स्वायत्त संस्थांना अवेक्षणासंदर्भातील सर्व माहिती ऑनलाईन भरण्यास दि. ०५/११/२०२४ ते ११/११/२०२४** पर्यंत लिंक संस्थेच्या Login मध्ये उपलब्ध करण्यात येईल. सर्व स्वायत्त संस्था, ज्या संस्थांचे फक्त एक वेळाच संस्था अवेक्षण केले जाते, अशा संस्था तसेच ज्या संस्थाचे NBA Accreditation झाले आहे अथवा ज्या संस्थांच्या अभ्यासक्रमाला Excellent दर्जा मिळाला आहे अशा सर्व संस्थानी देखील माहिती भरणे अनिवार्य आहे.

**संस्थानी भरलेल्या माहितीनुसार Online प्रणालीद्वारे त्याचा उपयोग मंडळाच्या विविध उपक्रमांमध्ये करण्यात येत असल्याने संबधित संस्था प्रमुखांनी सदर माहिती अचुक व परीपुर्ण असेल याची त्यांच्या स्तरावर खात्री करुन घ्यावी.**

वरील माहीती भरताना तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास त्याबाबत, **मोबाईल नं. ८३५५८७०५४४/९२०९४०३९३४** किंवा ई-मेल **acmonitoring@msbte.com** वर संपर्क साधावा. या शिवाय कोणत्याही अडचणी असल्यास संबंधित विभागीय कार्यालयास कळविण्यात याव्यात.

संस्थांनी ०४/११/२०२४ अखेर पर्यंतची शैक्षणिक माहिती भरणे अपेक्षीत असुन सदरची माहिती **दि. ११/११/२०२४** पर्यंत पुर्ण करुन submit करणे आवश्यक आहे. **दि. १२/११/२०२४ ते १४/११/२०२४** या कालावधीत **अभियांत्रिकी, फ़ार्मसी व वास्तुकला संस्थांसाठी रु.५०००/- आणि अल्प मुदतीचे अभ्यासक्रमाच्या संस्थांसाठी रु.३०००/-** एवढे विलंब शुल्क भरुन माहिती submit करता येईल.

**उपरोक्त कालावधीत संस्था अवेक्षणासंदर्भातील माहिती न भरणा-या संस्थांना रू. १०,०००/- इतकी रक्कम दंड स्वरूपात आकारण्यात येईल याची सर्व संस्थांनी प्रामुख्याने नोंद घ्यावी.** त्यामुळे सर्व संस्थांनी उपरोक्त कालावधीतच माहीती भरणे अनिवार्य आहे.

(उमेश टे. नागदेवे)
सचिव
म.रा.तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई.

प्रत:-उपसचिव, म.रा.तंत्र शिक्षण मंडळाचे विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नागपूर व छ. संभाजीनगर यांना माहीतीसाठी.